# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले (अर्थसंकल्प) अधिवेशन, २०२६

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### मुंबई आरोग्य विभागातील विविध योजनांना निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१) ९७६ (२४-०४-२०२५) श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईच्या आरोग्य विभागात निधीची कमतरता असल्याचे कॅगच्या २०१६-१७ ते २०२१-२२ या अहवालात स्पष्ट करण्यात आल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आरोग्य विभागाचा कारभार गतीमान करण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याकरीता तसेच रुग्णालयांसह विविध आरोग्य योजनांना गती देण्याकरीता तात्काळ निधी पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर (२७-०१-२०२६) :** (१) मा.महालेखापाल कार्यालयाच्या संपादणूक अहवालामध्ये निधी कमतरतेबाबत भाष्य करण्यात आले आहे, हे खरे आहे.
(२) राज्य शासनाद्वारे आरोग्य विभागाकरीता वाढीव निधी मंजूर करण्यात येत असून मूळ अर्थसंकल्पीय तरतूदीव्यतिरिक्त आवश्यकतेनुसार पूरक मागणीद्वारे आरोग्यविषयक योजनांना गती देण्याकरीता आवश्यक निधीची मागणी वित्त विभागास करण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### दावोस येथील जागतिक आर्थिक परिषदेत केलेल्या सामंजस्य करारातील उद्योगांची राज्यात झालेल्या निर्मितीबाबत

**(२) १४३७ (२४-०४-२०२५) ॲड.अनिल परब, श्री.पंकज भुजबळ, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण, श्री.शिवाजीराव गर्जे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दावोस येथे झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेदरम्यान राज्यातर्फे १५.७० लाख कोटी रुपये गुंतवणूकीच्या एकूण ५४ सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या असून सदर गुंतवणूकीमधून १५.९५ लाख रोजगार निर्मिती होणार असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गुंतवणूक कोणकोणत्या उद्योगक्षेत्रात होणार आहे व सदरील उद्योजक हे राज्यातील असणार आहेत काय,
(३) असल्यास, सदर उद्योगधंदे राज्यात किती कालावधीत सुरु होणार आहेत, तसेच आतापर्यंत किती उद्योगांची प्रत्यक्षात निर्मिती झाली आहे त्याचप्रमाणे सन २०१९ ते २०२५ वर्षनिहाय दावोस जागतिक आर्थिक फोरम परिषदेमध्ये झालेल्या सामंजस्य करारानुसार वर्षनिहाय प्रत्यक्षात किती गुंतवणूक व रोजगार निर्मिती झाली आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (३०-०१-२०२६) :** (१) दावोस, स्वित्झर्लंड येथील जागतिक आर्थिक परिषद-२०२५ मध्ये राज्य शासनामार्फत (उद्योग विभाग, मुंबई महानगरविकास प्राधिकरण-एमएमआरडीए आणि शहरे आणि औद्योगिक विकास महामंडळ, सिडको) ६३ सामंजस्य करार करण्यात आले आहेत.या सामंजस्य करारातून राज्यात आगामी कालावधीत रूपये १५,७२,६५४ कोटी गुंतवणूक व त्याद्वारे १५,९५,९६० इतका प्रत्यक्ष+अप्रत्यक्ष रोजगारनिर्मिती अपेक्षित आहे. ६३ सामंजस्य करारांपैकी उद्योग विभागाचे ५१ सामंजस्य करार आहेत.
(२) सदर सामंजस्य करारामध्ये कृषी, स्टील, माहिती व तंत्रज्ञान, हरित ऊर्जा, ॲटोमोबाईल्स आणि इलेक्ट्रिक वाहने, सोलर, वस्त्रोद्योग, डेटा सेंटर्स, इलेक्ट्रॉनिक्स, अवकाश आणि संरक्षण, जैवतंत्रज्ञान आणि औषधनिर्मिती, शितपेये, पायाभूत सुविधा, ड्रोन उत्पादन, शिक्षण इत्यादी क्षेत्रातील नामांकित कंपन्यांचा समावेश आहे.

सामंजस्य करार करण्यात आलेल्या कंपन्यामध्ये राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्याच्या उद्योजकांचा समावेश आहे.
(३) सन २०१९ मध्ये जागतिक आर्थिक परिषदेत कोणतेही सामंजस्य करार करण्यात आले नाहीत. तसेच राज्यात २०२० व २०२१ मध्ये कोविड-१९ च्या पार्श्वभुमीमुळे जागतिक आर्थिक परिषदेमध्ये सहभाग घेण्यात आलेला नाही. जागतिक आर्थिक परिषदेमधील सन २०२२,२०२३ व २०२४ मध्ये झालेल्या सामंजस्य करारापैकी अनुक्रमे ९५%, ६८% व ८३% प्रकल्प अंमलबजावणीच्या विविध टप्पावर कार्यरत आहेत. तसेच जागतिक आर्थिक परिषद-२०२५ मधील उद्योग विभागांशी संबंधित २५ कंपन्याना शासन स्तरावरून मा.मंत्रिमंडळ उपसमितीच्या मान्यतेने देकारपत्र देण्यात आले आहे. २०२५ मध्ये सामंजस्य करार करण्यात आलेले प्रकल्प अंमलबजावणीच्या विविध टप्प्यांवर कार्यरत आहेत. कोणत्याही औद्योगिक गुंतवणुकीसाठी/प्रकल्पातून उत्पादन सुरू होण्यासाठी किमान ३ ते ५ वर्षांचा कालावधी लागतो.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मौजे चांगदेव (ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव) येथील गवंडी प्रशिक्षण कार्यक्रमातंर्गत प्रशिक्षणार्थी मानधन थकविल्याबाबत

**(३) १५५३ (२४-०४-२०२५) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे चांगदेव (ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव) येथील प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण अंतर्गत गवंडी प्रशिक्षणाचे अनेक लाभार्थ्यांना प्रशिक्षणार्थी मानधन मिळाले नसल्याने येथील स्थानिक लोकप्रतिनिधींनी प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांच्याकडे दिनांक ११ सप्टेंबर, २०२४ रोजी पत्र व्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उर्वरित प्रशिक्षणार्थींना मानधन देण्याबाबत तसेच मानधन न देणाऱ्या संबंधित दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे (०२-०२-२०२६) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) तांत्रिक कारणामुळे ३ लाभार्थी चे मानधन रिजेक्ट झाले होते. तथापी आज रोजी सर्व लाभार्थींचे १००% मानधन दिले आहे. सबब कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील कुपोषित बालकांसाठी नवीन पोषण पुनर्वास केंद्र सुरु करण्याबाबत

**(४) १७९२ (२४-०४-२०२५) श्री.धीरज लिंगाडे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कुपोषित बालकांसाठी १३ ठिकाणी १ जानेवारी, २०२५ पासून नवीन पोषण पुनर्वास केंद्र सुरु करण्यात येणार असून कुपोषित बालके व त्यांच्या माता यासाठी स्वतंत्र किचन व खेळण्याची जागा असलेला एक स्वतंत्र वॉर्ड सामान्य रुग्णालयात केला जाणार आहे तसेच या वॉर्डत ६ जणांचे स्वतंत्र मनुष्यबळ असणार आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, मात्र आरोग्य विभागातील तांत्रिक मनुष्यबळाचा अभाव लक्षात घेता या वॉर्डासाठी शासनाने स्वतंत्र कर्मचारी नेमण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.प्रकाश आबिटकर (२१-०१-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत मंजूर पदभरती प्रक्रिया ही जिल्हास्तरावर सुरु आहे.

---

## राज्यातील ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रांमधील वैद्यकीय अधिकाऱ्यांना पदोन्नती देण्याबाबत

**(५) १८५५ (२४-०४-२०२५) श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण आणि आदिवासी विभागातील प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये कार्यरत असणाऱ्या ७१० वैद्यकीय अधिकाऱ्यांना गेले २३ वर्षांपासून पदोन्नती मिळालेली नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाच्या धोरणानुसार प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये वैद्यकीय अधिकारी गट-अ आणि गट-ब अशी दोन पदे मंजूर असून दोन्ही पदांची कर्तव्य सारखेच असतानाही दोघांमध्ये वेतन भत्ते आणि पदोन्नती यामध्ये फरक आहे, हे खरे आहे काय,असल्यास, उक्त फरकाची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, केंद्राप्रमाणेच महाराष्ट्रातही आयुर्वेदासाठी स्वतंत्र मंत्रालय स्थापन करावे तसेच ग्रामीण वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या पदोन्नती देण्याची मागणी महाराष्ट्र राज्य वैद्यकीय अधिकारी महासंघाने शासनाकडे वेळोवेळी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये कार्यरत ७१० वैद्यकीय अधिकाऱ्यांचा पदोन्नतीबाबत व वैद्यकीय अधिकारी गट-अ आणि गट-ब यांच्यातील वेतन भत्ते आणि पदोन्नती यात सुसूत्रता आणण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर (०३-०१-२०२६) :** (१) व (२) राज्यातील आदिवासी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये वैद्यकीय अधिकारी गट-अ व गट-ब यांचे प्रत्येकी एक पद आकृती बंधानुसार मंजूर आहे. तर बिगर आदिवासी भागातील प्राथमिक आरोग्य केंद्राकरीता वैद्यकीय अधिकारी गट-अ ची दोन पदे मंजूर आहेत.

वैद्यकीय अधिकारी गट-अ व गट-ब यांचे सेवाप्रवेश नियम वेगवेगळे आहेत. त्यानुसार गट-अ पदाची शैक्षणिक अर्हता एमबीबीएस आहे. तर गट-ब पदाची शैक्षणिक अर्हता बीएएमएस आहे. शैक्षणिक अर्हतेनुसार गट-अ व गट-ब पदाची कर्तव्य व जबाबदाऱ्या आरोग्य संस्थेनुसार विभीन्न आहेत.

(३) व (४) हे अंशतः खरे आहे.

वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या पदोन्नती देण्याची मागणी महाराष्ट्र राज्य वैद्यकीय अधिकारी महासंघाने शासनाकडे वेळोवेळी केलेली आहे व पदोन्नतीबाबत सुरु असलेल्या कार्यवाहीबाबत अर्जदारांना/संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांना अगवत करण्यात आले आहे.

वैद्यकीय अधिकारी गट-ब संवर्गातील अधिकाऱ्यांना गट-अ या संवर्गात पदोन्नती देण्याबाबतची पुढील कार्यवाही चालू आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## गड व किल्ले जतन व संवर्धन करण्यासाठी समितीची पुनर्स्थापना करण्याबाबत.

**(६) २४६३ (१७-०७-२०२५) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्रीमती चित्रा वाघ, श्री.संजय केणेकर, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गड-किल्ल्यांचे संवर्धन होवून अनेक शतके गडकिल्ल्यांवरील वास्तू सुरक्षित राहाव्यात यासाठी मार्गदर्शक प्रणाली तयार करुन त्यानुसार अंमलबजावणी होणे आवश्यक असून सन २०२२ मध्ये गड व किल्ले जतन व संवर्धन करण्यासाठी समितीची पुनर्स्थापना झाल्यानंतर संबंधित समितीची एकच बैठक झाली असल्याचे माहे मे,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, साऊंड व लाईट शोंचे नियोजन कोणकोणत्या गड किल्ल्यांवर करण्यात आले तसेच राज्यात नवे सरकार सत्तेत आल्यानंतर या समितीची पुनर्स्थापना झालेली नसल्याचे माहे मार्च, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर समितीची पुनर्स्थापना झाली नसल्याने गड व किल्ले संवर्धनामध्ये अडथळे येत असून तातडीने गड व किल्ले जतन व संवर्धन करण्यासाठी समितीची पुनर्स्थापना करण्याबाबत तसेच गड किल्ल्यांवर पर्यटन वाढण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार (१६-०२-२०२६) :** (१) हे खरे आहे.

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांच्याकडील दिनांक ३०/११/२०२२ रोजीच्या शासन निर्णय अन्वये गड संवर्धन समितीची स्थापना करण्यात आली होती. दिनांक २४/०१/२०२३ रोजी या समितीची बैठक श्री.संजय केळकर, मा.आमदार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली होती.

(२) हे खरे आहे,

राज्यात नवीन शासनाच्या स्थापनेनंतर अद्यापि गड संवर्धन समितीची पुनर्स्थापना करण्याची प्रक्रिया सुरू आहे. राज्यातील बहुतांशी गड किल्ले वन विभागाच्या क्षेत्रात येतात. सदर कार्यक्रम केल्यामुळे तेथील जैवविविधतेला धोक्यात येऊ शकते. त्यामुळे लाईट व साउंडशो करताना त्याबाबत वन विभाग, पर्यटन विभाग यांच्याशी समन्वय साधणे आवश्यक आहे.

(३) सांस्कृतिक कार्य विभागाच्या अर्थसंकल्पीय उपलब्ध निधीतून राज्य संरक्षित किल्ल्यांच्या जतन संवर्धनाचे कार्य केले जाते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात स्मार्ट पोस्ट पेड मीटर न बसवण्याबाबत

**(७) २५११ (१८-०७-२०२५) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले : तारांकित प्रश्न क्रमांक ३५७ ला दिनांक ५ मार्च, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विजेच्या वापरासाठी स्मार्ट पोस्टपेड मीटर प्रथम महावितरणच्या विविध प्रणाली मध्ये बसविण्यात येतील तद्नंतर शासकीय कार्यालये, शासकीय वसाहती तसेच उच्चदाब व लघुदाब औद्योगिक, वाणिज्यिक ग्राहकांना व नवीन वीज जोडणी करीता बसविण्यात येतील म्हणजेच सामान्य ग्राहकांना बसविण्याची सक्ती करण्यात येणार नाही असे विधानपरिषद सभागृहात शासनाने माहे मार्च २०२५ मध्ये आश्वासन दिले असतानाही राज्यात स्मार्ट पोस्टपेड मीटर बसविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ठाणे जिल्ह्यातील कल्याण परिसरातील रौनक कॉरपोरेशन या गृहनिर्माण संस्थेमधील सर्व इमारतीमध्ये पोस्ट पेड मीटर बसविण्यासंदर्भात महावितरणने दिनांक १९ मार्च, २०२५ रोजी नोटीस देऊन जबरदस्तीने जुन्या ग्राहकांना पोस्टपेड मीटर बसविण्यात आलेले असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबई उपनगर, ठाणे, कल्याण इत्यादी सह संपूर्ण राज्यात स्मार्ट पोस्ट मीटर बसविण्यात येत आहेत, सदरचे बसविलेले स्मार्ट पोस्ट पेड मीटर हे भविष्यात प्री पेड करण्याचे शासनाचे धोरण आहे काय,
(४) असल्यास, ग्राहकांचा स्मार्ट मीटरला होणारा विरोध लक्षात घेता स्मार्ट मीटर बसवण्याचा निर्णय मागे घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (११-०२-२०२६) :** (१) हे खरे नाही.

केंद्र शासनाच्या दिनांक १७/०८/२०२१ रोजीच्या राजपत्रानुसार सर्व वीज वितरण कंपन्यांना स्मार्ट मीटर बसविण्याचे सुचित केले आहे. त्यानुसार राज्यात वीजेच्या वापरासाठी स्मार्ट मीटर प्रथम महावितरणच्या विविध प्रणाली मध्ये बसविण्यात येत आहेत. तद्नंतर शासकीय कार्यालये, शासकीय वसाहती तसेच उच्चदाब व लघुदाब औद्योगिक, वाणिज्यिक ग्राहकांना व नवीन वीज जोडणी करीता बसविण्यात येत आहेत. महावितरण कंपनीकडून स्मार्ट मीटर बसविताना ग्राहकांना त्यांचे प्रबोधन करुन व त्यांना स्मार्ट मीटर संबंधी माहिती देऊन तसेच सोसायटयांमधील सदस्यांची भेट घेऊन मीटर बसविण्यात येत आहेत. तसेच इतर ग्राहकांचे स्मार्ट मीटर बद्दल गैरसमज दूर करून त्यांना स्मार्ट मीटर बसविण्यात येत आहेत.

(२) हे खरे नाही,

कल्याण परिसरातील रौनक कॉर्पोरेशन या गृहनिर्माण संस्थेमधील सर्व इमारतीमध्ये स्मार्ट मीटर बाबत पूर्व सूचना देऊन स्मार्ट मीटर बसविण्यात आले आहेत.

(३) स्मार्ट प्रीपेड मीटर बसविण्याबाबत काही ग्राहक संघटना, वीज कामगार संघटनांनी विरोध दर्शविला होता.त्याअनुषंगाने आश्वासित केल्याप्रमाणे सद्य:स्थितीत ग्राहकांना सदर मीटर प्रीपेड पध्दतीने न बसविता सध्याच्या प्रचलित पोस्ट पेड पध्दतीनेच बसविण्यात येत आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

## केंद्र शासनामार्फत संरक्षित असलेल्या सर्व किल्ले संरक्षण व जतन तसेच देखभाल व दुरुस्तीसाठी राज्य शासनाच्या अखत्यारित देण्याबाबत

**(८) २८८८ (१७-०७-२०२५) श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ५४ गडकिल्ले हे केंद्र शासनामार्फत संरक्षित असून उर्वरित अन्य ६२ गडकिल्ले राज्य संरक्षित असल्यामुळे सर्व किल्ल्याचे संरक्षण व जतन, देखभाल व दुरुस्तीसाठी राज्य शासनाच्या अखत्यारित देण्याबाबतचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे मा.सांस्कृतिक कार्य मंत्री यांनी सादर केला असल्याचे दिनांक २५ मार्च,२०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाकडून पाठविण्यांत आलेल्या सदर प्रस्तावावर केंद्र शासनाने (भारतीय पुरातत्व विभाग) त्याबाबतच्या हस्तांतरणाची प्रक्रिया सुरु केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार (१६-०२-२०२६) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

सदर प्रस्तावावर केंद्र शासनाने कोणतेही अभिप्राय शासनास कळविले नाहीत.

(३)प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात पाणलोट क्षेत्रात जलसंधारण व मृद संधारणाच्या कामांवर मोठ्या प्रमाणावर निधी खर्च करूही पाणी पातळीत अपेक्षित वाढ झालेली नसल्याबाबत

**(९) २९०९ (१०-०७-२०२५) श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पाणलोट क्षेत्रात जलसंधारण व मृद संधारणाच्या कामांकरीता मोठ्या प्रमाणावर निधी खर्च करण्यात येत असतानाही पाणी पातळीत अपेक्षित वाढ झालेली नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भूजल सर्वेक्षण आणि विकास संस्था (GSDA) ने राज्यातील प्रत्येक गावात यासाठी मोजमाप (मॅपिंग) केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जल व मृद संधारणाचे कामे या मॅपिंग नुसारच होण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड (०३-०२-२०२६) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमार्फत राज्यातील प्रत्येक गावात भूजलाचे मोजमाप न करता राज्यातील ३७११ निरीक्षण विहिरींच्या स्थिर भूजल पातळीच्या नोंदी वर्षातून चार वेळा (माहे जानेवारी, मार्च, मे व सप्टेंबर) घेण्यात येतात.

(३) विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजना- पाणलोट विकास घटक आणि जलयुक्त शिवार अभियान या योजनांतर्गत मृदसंधारण व जलसंधारणांची कामे भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा (GSDA) यांनी घोषित केलेल्या पाणलोटांमध्ये (Over Exploited, Critical, Semi-Critical) प्राधान्याने कामे करण्यात येतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे वाळूज (छत्रपती संभाजीनगर) येथील औद्योगिक वसाहतीमध्ये कार्यरत असलेल्या कंत्राटी कामगारांना किमान वेतन मिळणेबाबत

**(१०) ३२८३ (०९-०७-२०२५) श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वाळूज (जि.छत्रपती संभाजीनगर) येथील एमआयडीसी मध्ये सुमारे साडेचार लाख कामगार कार्यरत असून त्यापैकी अंदाजे ३ लाख कामगार हे कंत्राटी तत्त्वावर काम करित असल्याचे व त्यांना किमान वेतनही मिळत नसून अनेक कंपन्यांमध्ये बारा तास काम करूनही त्यांना मासिक बारा ते पंधरा हजार रुपये इतके वेतन दिले जात असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मौजे वाळूज (जि.छत्रपती संभाजीनगर) येथील एमआयडीसी मधील कामगारांना किमान वेतन मिळावे तसे त्यांना सर्वच स्तरावर सुरक्षितता देण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर (०८-०१-२०२६) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सातारा जिल्ह्यातील किल्ला अजिंक्यताऱ्याचे संवर्धन करतांना दगडी पिंजऱ्याचे देखील पुनरुज्जीवन करण्याबाबत

**(११) ३६०२ (१८-०७-२०२५) श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा येथील किल्ले अजिंक्यताराचे पालिका प्रशासन व पुरातत्व विभागाने संवर्धनाचे काम हाती घेतले असून, सदर काम करतांना दगडी पिंजऱ्याला ऊर्जितावस्था द्यावी, अशी मागणी इतिहासप्रेमीकडून होत असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त दगडी पिंजऱ्यावर मोठ्या प्रमाणात झुडपे वाढली असून दगड मातीखाली गाडले गेले आहेत सदर अजिंक्यताऱ्याचे संवर्धन करतांना पिंजऱ्याचे देखील पुनरुज्जीवन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत,

**ॲड. आशिष शेलार (१६-०२-२०२६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

नियोजन विभागाच्या जिल्हा वार्षिक योजना २०२४-२५ अंतर्गत अजिंक्यतारा किल्ला, जि.सातारा या स्मारकाचे जतन दुरूस्ती व संवर्धनाचे काम हाती घेतलेले आहे.

तथापि, दगडी पिंजऱ्याबाबत सातारा नगरपरिषद यांनी दिलेल्या माहितीनुसार त्यांच्याकडे याबाबत मागणी प्राप्त झाली नाही.
(२) सदर दगडी पिंजरा अजिंक्यतारा किल्लयावर नसून किल्ल्याशेजारी खाजगी जागेत आहे. सबब, शासनामार्फत सदर दगडी पिंजऱ्याचे पुनरुज्जीवन करण्याबाबत प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नाशिक जिल्ह्यातील भगूर या ठिकाणी भव्य थीम पार्क व संग्रहालयाच्या कामाबाबत

**(१२) ३७८७ (१८-०७-२०२५) श्री.संदीप जोशी :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) स्वातंत्र्यवीर सावरकरांचे जन्मगांव असलेल्या भगूर येथे भव्य थीम पार्क व संग्रहालय उभारण्याची घोषणा दिनांक २६ फेब्रुवारी २०२३ रोजी तत्कालीन पर्यटन मंत्री यांनी केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकल्पाला लागणारी जागा भगूर पालिकेने उपलब्ध करुन दिली असूनही पर्यटन विभागाने सदर जागा ताब्यात घेतली नसून या प्रकल्पासाठी किती निधी शासनाने उपलब्ध करुन दिला आहे तसेच या प्रकल्पाची सद्य:स्थिती काय आहे,
(३)असल्यास, उक्त प्रकरणी तातडीने दखल घेवून प्रकल्प पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शंभूराज देसाई (११-०२-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३), व (४) सदर जागा भगूर नगरपरिषदेची असून हे काम करण्यासाठी भगूर नगरपालिका व मपविम यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला आहे. या प्रकल्पास विभागाने दिनांक १० ऑक्टोंबर, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये रुपये १५००.०० लक्ष इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता देऊन रुपये १५०.०० लक्ष निधी वितरीत केला आहे.म.प.वि. महामंडळामार्फत कामास दिनांक २४/०६/२०२५ रोजी कार्यादेश निर्गमित करण्यात आला आहे व काम सुरु करण्यात आले आहे.

---

## राज्यातील सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग विकासासाठी परवाने प्रक्रिया जलदगतीने करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(१३) ३९२३ (१०-०७-२०२५) श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रातील सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग (MSME) क्षेत्र राज्याच्या औद्योगिक विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे असून या क्षेत्रातील उद्योगांना "ईज ऑफ डुईंग बिझनेस" सुलभ व्हावे याकरीता पर्यावरण विभागाची अनापत्ती प्रमाणपत्र (NOC) आणि अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरणाची (FSSAI) परवाने तात्काळ मिळण्याकरीता काही सुधारणा प्रस्तावित केल्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात सध्या परवानगी प्रक्रिया न मिळाल्यामुळे उत्पादन सुरू करू न शकलेल्या उद्योगांची विभागनिहाय संख्या काय आहे,

(३) असल्यास, शासनाने राज्यातील सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना लवकर परवाने मिळण्यासाठी तसेच सदर उद्योगातून रोजगार निर्मितीकरण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (२९-०१-२०२६) :** (१) हे खरे नाही.

सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग (MSME) स्थापित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळव्दारे अनुमती देण्यात येत होती. परंतु आता सदर प्रक्रिया जलदगतीने होण्यासाठी केंद्रीय पर्यावरण वने व वातावरणीय बदल मंत्रालय यांनी दिनांक १४/०१/२०२५ च्या कार्यालयीन ज्ञापनान्वये सदर अनुमतींचे एकत्रिकरण केले असून पूर्व पर्यावरण अनुमतीची आवश्यकता असलेल्या उद्योगांना/प्रकल्पांना स्वतंत्रपणे अनुमती घेण्यापासून आता सूट देण्यात आली आहे.

तसेच भारतीय अन्न सुरक्षा आणि मानके प्राधिकरण, नवी दिल्ली (FSSAI) ही भारत सरकारच्या आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या (Ministry of Health and Family Welfare) अंतर्गत काम करणारी स्वायत्त संस्था आहे. अन्न सुरक्षा व मानके कायदा अंतर्गत परवाने/नोंदणी प्रमाणपत्र देण्याबाबतच्या धोरणाचे नियोजन व अंमलवजावणी हे भारतीय अन्न सुरक्षा आणि मानके प्राधिकरण, नवी दिल्ली यांच्या मार्फत होत असून अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य त्याबाबत धोरण ठरवीत नाही. सबब, अन्न सुरक्षा व मानके कायदा अंतर्गत परवाना/नोंदणी प्रमाणपत्र तत्काळ देण्याबाबत अन्न व औषध प्रशासनाने सुधारणा प्रस्तावित केलेल्या नाहीत.

(२), (३), (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मंद्रूप (ता.दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर) येथे औद्योगिक वसाहत स्थापन करुन स्थानिकांना रोजगार उपलब्ध होणेबाबत

**(१४) ४११७ (१०-०७-२०२५) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंद्रूप (ता.दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर) येथे एमआयडीसी, होटगी लॉजिस्टिक पार्कसह अन्य मागण्यांकरीता स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिलेल्या निवेदनानुसार मा.मंत्री, उद्योग महोदयांकडे बैठक झाली असून याबैठकीस जवळपास तीन महिन्यांचा कालावधी होऊनही मान्य केलेल्या सर्व मागण्या प्रलंबित असल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागण्या प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत तसेच दक्षिण सोलापूर मतदारसंघातील मंद्रूप एमआयडीसी, होडगी लॉजिस्टिक पार्क आणि इतर उद्योग उभारून येथील बेरोजगारांना रोजगार मिळण्याकरीता शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (२८-०१-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे.

मौजे होटगी, ता.दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर येथील पाटबंधारे विभागाची २०.० हे.आर जमीन लॉजिस्टिक पार्क उभारण्याकरीता पाटबंधारे विभागाच्या महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या नियामक मंडळाची मान्यता प्राप्त झाली आहे.
(२) स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या समवेत झालेल्या उपरोक्त दिनांक २०/०३/२०२५ रोजीच्या बैठकीत मंद्रुप MIDC स्थापन करण्याबाबत सविस्तर चर्चा झाली. सदर बैठकीमध्ये मौजे मंद्रुप व मौजे माळकवठे येथील शेतकऱ्यांकडून संमतीपत्र प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात यावी असा निर्णय झाला. तथापि, अदयाप संबंधित शेतकऱ्यांची संमती प्राप्त झालेली नाही.

तसेच जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी त्यांच्या दिनांक १४/११/२०२५ रोजीच्या पत्रान्वये,मौजे होटगी येथील २०.० हे.आर क्षेत्रात लॉजिस्टिक पार्क ऐवजी आयटी पार्क उभारण्याबाबत विनंती केली आहे. त्यानुषंगाने उच्चाधिकार समितीच्या दिनांक ०९/१२/२०२५ रोजीच्या १८० व्या बैठकीत मौजे होटगी, ता.दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर येथील २० हे.आर क्षेत्रावर आय.टी.पार्क उभारण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम.१९६१ नुसार भुसंपादनाबाबत पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सोपारा (ता.वसई, जि.पालघर) येथील बौध्दस्तुपाचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(१५) ४४५४ (१८-०७-२०२५) श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोपारा (ता.वसई, जि.पालघर) येथील बौध्द धर्मियांचे स्थान असलेले बौध्दस्तुपाचे काम मागील १० वर्षापासून पुरातत्व विभागाची परवानगी न मिळाल्याने प्रलंबित असल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भगवान गौतम बुद्धांच्या पाऊलखुणा असलेल्या या सोपारा पावन भूमिचे ऐतिहासिक महत्त्व पुढील पिढीला समजावे याकरीता मागील १० वर्ष प्रलंबित असलेले काम विकसित करणेबाबत तसेच पुरातत्व विभागाची परवानगी मिळण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**ॲड. आशिष शेलार (११-०२-२०२६) :** (१) हे खरे नाही.
(२) सोपारा (ता.वसई, जि.पालघर) येथील बौध्द स्तूप हे भारतीय पुरातत्व सर्वेक्षण (ASI), मुंबई मंडळाच्या अखत्यारीतील केंद्र संरक्षित स्मारक आहे. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, मुंबई मंडळ या कार्यालयाला अद्यापपर्यंत कोणताही प्रस्ताव प्राप्त झालेला नाही. तसेच, भारतीय पुरातत्व सर्वेक्षणने पिण्याच्या पाण्याची सोय, स्वच्छतागृह आणि अभ्यागतांना सहज प्रवेशासाठी रॅम्पसह पोहोचमार्ग यांसारख्या सार्वजनिक सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. तथापि, संवर्धन आणि जीर्णोद्धाराची कामे आवश्यकता, सक्षम प्राधिकाऱ्यांची मंजुरी आणि वार्षिक जतन आराखड्या अंतर्गत निधीच्या उपलब्धतेनुसार केली जात आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## साखरी नाटे (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथील श्री घेरा यशवंतगड किल्ल्याच्या दुरूस्तीचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(१६) ४४५९ (१८-०७-२०२५) श्री.विक्रांत पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) साखरी नाटे (ता. रत्नागिरी, जि.राजापूर) येथील घेरा यशवंतगड हा किल्ला पुरातत्व विभागाच्या अखत्यारित येत असून या किल्याच्या दुरुस्तीच्या कामासाठी आठ कोटी रुपायांचा निधी खर्ची करण्यात आला असून किल्ल्याच्या डागडुजी आणि दुरुस्तीचे काम सुरू असताना आठ दिवसापूर्वीच नवीन बांधकामाची एक भिंत कोसळली असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर किल्ल्याच्या दुरुस्तीच्या ठिकाणी कंत्राटदाराच्या कोणतेही सूचना फलक लावलेले नसून तसेच कोणतीही सुरक्षा व्यवस्था नसल्यामुळे पर्यटकनाच्यादृष्टीने किल्ला धोकादायक झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त गडकिल्ल्यांचे संवर्धन करताना संबंधित विभागाचे अधिकारी व बेजबाबदार पध्दतीने काम करणाऱ्या कंत्राटदारावर कारवाई करण्याबाबत व संबंधित कंत्राटदाराचे कंत्राट रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**ॲड. आशिष शेलार (१६-०२-२०२६) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

सदर किल्ल्याच्या जतन दुरूस्ती कामाकरीता रुपये ८.११ कोटी इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. यामधील सदर कामाकरीता रुपये १.४७ कोटी इतका निधी खर्च करण्यात आला आहे.

यशवंतगड किल्ल्याची जुनी जांभा दगड व मातीच्या बांधकामाची भिंत पावसाच्या पाण्यामुळे ढासळली व ती नविन बांधकामाच्या काही भागावर पडल्याने नविन संरक्षक भिंतीचा काही भाग क्षतीग्रस्त

होऊन पडलेला आहे.

सदर बाब निदर्शनास आल्यानंतर या ठिकाणी तातडीने सूचना फलक लावण्यात आले व बांधकाम आणखी ढासळू नये म्हणून आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. त्यामुळे पर्यटनाच्या दृष्टीने सदर ठिकाणी कुठलीही बाब धोकादायक नाही.

(३) यशवंतगड किल्ल्याचे पडलेले बांधकाम हे संबंधित कंत्राटदाराच्या स्वखर्चाने पुन्हा करण्यात येत आहे. सदर कामाच्या देखरेखीसाठी तहसिलदार, राजापूर यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली असून त्यात स्थानिक लोक व सरपंच यांचा समावेश करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

## सिंधुदुर्गातील किल्ल्यांचा अभ्यास करण्यासाठी मुंबई विद्यापीठात स्वतंत्र अध्यासन केंद्र सुरु करण्याबाबत

**(१७) ४६४३ (२५-०८-२०२५) श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्गातील सिंधुदुर्ग किल्ला, पद्मदुर्ग किल्ला, राजकोट किल्ला आणि सर्जेकोट किल्ला या किल्ल्यांचा अभ्यास करण्यासाठी मुंबई विद्यापीठात स्वतंत्र अध्यासन केंद्र सुरु करण्याची घोषणा सांस्कृतिक कार्य मंत्री महोदयांनी केली असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सांस्कृतिक कार्य विभागाच्या या अध्यासन केंद्रासाठी ५० लाख रुपयांचा निधी देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई विद्यापीठात स्वतंत्र अध्यासन केंद्र कधीपर्यंत सुरू करण्यात येणार आहे तसेच हे केंद्र केवळ सिंधुदुर्ग किल्ला, पद्मदुर्ग किल्ला, राजकोट किल्ला आणि सर्जेकोट किल्ला या किल्ल्यांच्या अध्यासना करता न करता सर्वच किल्ल्यांच्या अध्यासनाकरता करून त्यासाठी पुरेसा निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार (१६-०२-२०२६) :** (१) हे अंशतः खरे आहे.

(२) हे खरे आहे,

(३) मा.मंत्री, माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य विभाग यांनी दिनांक १५/०४/२०२५ रोजी सिंधुदुर्गातील सिंधूदुर्ग किल्ला, पद्मदुर्ग किल्ला, राजकोट किल्ला आणि सर्जेकोट किल्ला या किल्ल्यांचा अभ्यास करण्यासाठी मुंबई विद्यापीठांतर्गत दुर्ग किल्ले अध्ययन केंद्राला रुपये ५० लाख देण्याची घोषणा केली आहे.

त्यास अनुसरून सिंधुदुर्ग किल्ला, पद्मदुर्ग किल्ला, राजकोट किल्ला व सर्जेकोट किल्ला या किल्ल्यांचा अभ्यास करण्यासाठी दुर्ग अध्ययन केंद्र स्थापन करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

## राज्यातील शाळांमध्ये मुलांना पुरविण्यात येणारा प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना पारदर्शकपणे राबविण्याबाबत

**(१८) ४८४५ (२१-११-२०२५) श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शालेय पोषण आहार योजना ही आता प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना म्हणून ओळखली जात असून, सदर केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत शासकीय आणि अनुदानित शाळांमध्ये इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना गरम आणि पौष्टिक मध्यान्ह भोजन पुरविण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शाळांमध्ये मुलांना पुरविण्यात येणारा प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत मध्यान्ह भोजनातील विषबाधाचे प्रकार रोखण्यासाठी नवीन मार्गदर्शक सुचना जाहीर केल्या असून त्यानुसार वेगवेगळे व्यंजन बनवून देणे याचीही यादी बनवून दिलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामध्ये शाळा व्यवस्थापन समितीवरही जबाबदारी निश्चित करण्यात आली परंतु, राज्यभरात १५ हजार पेक्षा अधिक शाळांमध्ये मुख्याधापक पद रिक्त असल्याने उक्त जबाबदारी कोणत्या यंत्रणेद्वारे शासन पार पाडणार आहे, तसेच मा.न्यायालयाने शाळांतील अन्नाच्या तपासणीसाठी अन्न निरीक्षकांची नियुक्ती करण्याचे आदेश दिले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, काही शाळांमध्ये विद्यार्थी संख्येनुसार पोषण आहार पुरवणाऱ्या कंत्राटदाराकडून सर्व पोषण आहारातील साहित्य मिळत नाहीत तसेच काही पदार्थ हे निकृष्ट दर्जाचे असल्याच्या तक्रारी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, विद्यार्थ्यांच्या भवितव्याकरीता ही योजना पारदर्शक पध्दतीने राबविण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०४-१२-२०२५) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) शाळांमध्ये मुख्याध्यापक पद रिक्त असल्यास सदर शाळेमध्ये प्रभारी मुख्याध्यापकाची नियुक्ती शाळा व्यवस्थापन समितीमार्फत करण्यात येते. योजनेची अंमलबजावणी मुख्याध्यापक किंवा प्रभारी मुख्याध्यापक यांचेमार्फत सुरु आहे. अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ अंतर्गत अन्न सुरक्षा अधिकारी हे त्यांच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या शाळांतील अन्न पदार्थांचे नमुने आवश्यकतेनुसार विश्लेषणासाठी घेत असतात.

(४) हे खरे नाही.

पुरवठादार संस्थेकडून शाळा स्तरावर निकृष्ट दर्जाचा आहार पुरवठा केल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाने पुरवठदारास अवगत करुन दिल्यानंतर ०७ दिवसाच्या आत सदरचा माल स्व खर्चाने बदलून देणे संबंधित पुरवठादारास बंधनकारक आहे. संबंधित पुरवठादाराने सदराचा माल बदलून न दिल्यास सदर मालाची देयके अदा करण्यात येत नाहीत.

(५) राज्य शासनामार्फत एमडीएम पोर्टलची निर्मिती करण्यात आली असून केंद्र शासनामार्फत ॲटोमॅटेड मॉनीटरींग सिस्टीम (AMS) प्रणाली विकसीत करण्यात आलेली आहे. योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना देण्यात

येणाऱ्या लाभाची दैनंदिन माहिती शाळा स्तरावरुन एमडीएम पोर्टलवर भरण्यात येते. शाळांनी नोंदविलेल्या दैनंदिन लाभाच्या माहितीनुसार जिल्हास्तरावरुन एमडीएम पोर्टलव्दारे इंधन, भाजीपाला व धान्यादी मालाची देयके तयार करुन शाळांच्या खात्यावर वर्ग करण्यात येतात. योजनेच्या प्रभावी अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने शासनाने दिनांक ०१/०६/२००९ रोजीच्या शासन निर्णयानुसार भरारी पथके आणि दक्षता पथके स्थापन करुन शाळांमध्ये अचानक भेटी देण्याबाबतचे निर्देश दिलेले आहे. त्यानुसार जिल्हा व तालुका स्तरावर भरारी व दक्षता पथके गठीत करुन शाळांना नियमित भेटी देण्यात येत आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जिल्हा सामान्य रुग्णालय (इर्विन)(जि.अमरावती) येथे प्रयोगशाळेकरीता यंत्रसामुग्री व मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१९) ६०३७ (२६-११-२०२५) श्री.संजय खोडके :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिल्हा सामान्य रुग्णालय (इर्विन)(जि.अमरावती) येथे सर्वच आजारांचे निदान एकाच ठिकाणी करता यावे तसेच रुग्णांना तातडीने उपचार सेवा मिळावी यासाठी केंद्रीय आरोग्य मंत्रालयाच्यावतीने एकात्मिक सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा (लॅब) मंजूर करुन यासाठी १.२५ कोटी रुपयांचा निधीही मंजूर करण्यात आला असून दिनांक २५ फेब्रुवारी, २०२४ रोजी मा.प्रधानमंत्री यांच्या हस्ते ऑनलाइन पध्दतीने या लॅबचे उद्घटान करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दीड वर्षाचा कालावधी पूर्ण होऊनही अद्याप ही लॅब पूर्णपणे कार्यान्वित झालेली नसून या लॅबसाठी आवश्यक असलेली यंत्रसामुग्री तसेच मनुष्यबळ अजूनही उपब्लध झाले नसल्याने अनेक विभाग बंद असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हा सामान्य रुग्णालय (इर्विन) येथील लॅब रुग्णांच्या सेवेत पूर्णक्षमतेने कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने येथे यंत्रसामुग्री व मनुष्यबळ मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर (०२-१२-२०२५) :** (१) हे खरे आहे.
दिनांक २५ फेब्रुवारी २०२४ रोजी मा.प्रधानमंत्री यांच्या हस्ते ऑनलाईन पध्दतीने IPHL चे उद्घाटन करण्यात आले आहे व त्याच दिवसापासून ती कार्यान्वित करण्यात आली.
(२) हे खरे नाही,
Essential (अत्यावश्यक) यंत्रसामुग्री उपलब्ध आहे. तसेच मानकानुसार मनुष्यबळ उपलब्ध झालेले असून या रुग्णालयात कार्यरत आहे. मानकानुसार १३४ पैकी १०० अधिक चाचण्या In-house होत आहेत व उर्वरीत ३४ चाचण्या या PPP mode वर होत आहेत.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुसेगाव (ता.सेनगाव,जि.हिंगोली) येथील आरोग्य उपकेंद्रातील वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी उपलब्ध नसल्याने आरोग्य केंद्राची दुरवस्था झाल्याबाबत

**(२०) ६२७४ (२६-११-२०२५) डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुसेगाव (ता.सेनगाव,जि.हिंगोली) येथील आरोग्य उपकेंद्रात मागील ७ ते ८ महिन्यांपासून वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी उपस्थित राहत नसल्याने ग्रामीण भागातील रुग्णांना आवश्यक आरोग्य सेवा मिळत नसून त्यांना खाजगी रुग्णालयांमध्ये उपचार घ्यावे लागत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आरोग्य उपकेंद्र इमारतीची दुरवस्था झाली असून येथे मनुष्यबळाचा अभाव आणि निधीची कमतरता या समस्यांमुळे या उपकेंद्रात अनेक महिन्यापासून कोणत्याही प्रकारचे लसीकरण झालेले नसल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुसेगाव येथील आरोग्य उपकेंद्रांची दुरवस्था सुधारण्यासाठी तसेच येथील वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांच्या अनुपस्थितीची चौकशी करुन संबंधित दोषींवर कारवाई करुन रुग्णांना वेळेत उपचार मिळण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर (०९-१२-२०२५) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) उपकेंद्र, पुसेगाव येथील लसीकरणाचे कामकाज व्यवस्थित पार पाडण्यासाठी अन्य आरोग्य सेविकेस आदेशित केले असून लसीकरणाचे कामकाज सुरळीतपणे पार पाडले जात आहे. पुसेगाव आरोग्य उपकेंद्रातील कामकाजात कसूर करणाऱ्या संबंधित आरोग्य सेविकेची तात्पुरत्या स्वरुपात बदली करण्यात आली असून त्यांच्या बाबतीत तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी समिती नेमून चौकशी अहवाल प्राप्त झाला आहे व त्यानुसार पुढील प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **डॉ. विलास आठवले**
**मुंबई.** **सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.